0058151

FORM-1A

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला. प्र. वि., पहिली खबर क्र. FIR No.: ०३, वर्ष Year: २४, दिनांक Date: ०६/०२/२४

2. (i) अधिनियम Act: भ्र. प्र. अधि. १९८८, कलमे Sections: ७
   (ii) अधिनियम Act ..... कलमे Sections .....
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections .....

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ....., तारीख पासून Date from: २२/१२/२३, वेळ Time: ०८:०७, तारीख पर्यंत Date to: २९/१२/२३, Time: ११:३० वा

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: २१/१२/२०२३, वेळ Time: १३.३६ वा.

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: १८, तारीख Date: ०६/०२/२४, वेळ Time: १८:०० वा

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ....., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. .....

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: गरम मसाला हॉटेल, ठिकाणाचे नंबर No. If any: ऐरोली, गल्ली Ward: नवी मुंबई, रस्त्याचे नाव Name of road .....

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ....., गाव Village ....., पोस्ट Post ....., तालुका Taluka ....., जिल्हा Dist. ....., राज्य State .....

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ....., तालुका Taluka ....., जिल्हा Dist. ....., राज्य State .....

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant ; Permanent Address.

   (a) नाव Name: आप्पा गोरख पाटील (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: गोरख पाटील

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ५१ वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: ९२२३३३१३३३

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ....., दिल्याचा दिनांक Date of Issue ....., दिल्याचे ठिकाण Place of Issue ....., (f) व्यवसाय Occupation .....

   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste ....., जनजात Sub-Caste .....

   (h) पत्ता Address: २९३, गल्ली / सेक्टर नं. Ward, घर / नाव नं. House/Name No.: सुंदरम को. ऑप. सोसायटी, फोन / मो. नं. Phone/M. No.: प्लॉट नं. २, पॅन नं. PAN No.: सेक्टर नं. ३, कार्ड नं. Card No.: ऐरोली, नवी मुंबई

   रस्त्याचे नाव Road: मूळ गाव - चिक्कमहूद, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ....., गाव Village ....., पोस्ट Post ....., पो. स्टे. P. Stn. .....

   तालुका Taluka: सांगोला, जिल्हा Dist.: सोलापूर, राज्य State ....., सध्याचा पत्ता Present Address .....

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभिलेखा यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   अरविंद खिरडकर, पोलीस उपनिरीक्षक, आइप पोलीस ठाणे

यातील फिर्यादि नामे आण्णा गोरख पाटील, हि/५१ वर्षे, रा. हि. २०३ सुंदरम को ऑप. हौ. सोसायटी, फ्लॅट नं. २ सेक्टर नंबर - १ नेरूळ नवी मुंबई यांच्या स्वतंत्र कागदावर टंकलिखीत केलेला जबाब हाच या गुन्ह्यातील प्रथम खबरी अहवाल म्हणून समजण्यात यावा.

समक्ष

(सूरज बनसोडे)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. ठाणे

जबाब

दिनांक :- ०६/०२/२०२४

श्री.,आण्णा गोरख पाटील, हिं/ ५१ वर्षे, धंदा – व्यवसाय ( शिक्षण संस्था व शेती ) रा.ठि. चिकमहूद, ता.सांगोला, जि.सोलापूर, सध्या रा. २१३ सुंदरम को.ऑप.सोसायटी, प्लॉट नंबर २, सेक्टर १, नेरूळ, नवी मुंबई ४००७०६, मोबाईल क्र. ९२२३३३१३३३, आधार कार्ड क्रमांक – २७७१ १२९७ ६०८२

--------०००००--------

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर कुटुंबासह मागील ४० वर्षापासून राहावयास आहे. वर नमूद गावी माझा वडीलोपार्जित शेतीचा व्यवसाय असून मी रूषीतुल्य शिक्षण प्रसारक मंडळ ही शिक्षण संस्था देखील चालवितो.

जून २०२२ मध्ये मी तसेच माझी मुलगी तृप्ती असे दोघांनी संगणमताने स्वस्तात म्हाडाचे घर मिळवून देतो असे सांगूण फसवणूक केली याबाबत आमचे दोघांचे विरूध्द संजय शांताराम तावडे याने भांडूप पोलीस स्टेशन याठिकाणी तकारी अर्ज दिला होता. सदर अर्जावरुन आमचे विरोधात भांडूप पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आल्याबाबतचे समजपत्र पोलीस उप निरीक्षक अरविंद बिराजदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक ९७६४३१२१३० वरुन माझ्या व्हॉटस् अॅप मोबाइल क्रमांक ९२२३३३१३३३ वर पाठविले होते परंतू मला तक्रारीचे स्वरूप समजले नसल्याने व मी गावी असल्याने पोलीस स्टेशनला हजर राहिलो नव्हतो.

दिनांक ०५/११/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वा. चे सुमारास मी माझे मूळ गावी चिकमहूद बंडगरवाडी नंबर १ याठिकाणी असताना पोलीस उप निरीक्षक बिराजदार, त्यांचे स्टाफ सोबत आले व त्यांनी मला माझे विरूध्द भांडूप पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल असल्याचे सांगितले तसेच सांगोला पोलीस स्टेशन येथे सदरबाबत माहिती देवून मला भांडूप पोलीस स्टेशन येथे घेवून आले व नमूद गुन्हयात अटक केली. त्यावेळी मी व माझी मुलगी तृप्ती असे दोघांविरूध्द संजय तावडे याने दिलेल्या तक्रारीनुसार भांडूप पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५२४/२०२२, कलम ४२०, ४०६ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल असल्याचे व या गुन्हयाचा तपास पो.उप निरीक्षक अरविंद बिराजदार हे करीत असल्याचे मला समजले.

मी पोलीस कोठडीत असताना माझी मुलगी तृप्ती हिला अटक न करण्यासाठी माझा मुलगा प्रफुल्ल याचेकडून पीएसआय बिराजदार याने १,००,०००/– रूपये इतकी रक्कम दिनांक १३/११/२०२३ रात्रौ ०९.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे येथील चौथ्या माळ्या वरील ऑफिस मध्ये घेतलेली असल्याचे माझा मुलगा प्रफुल्ल याने पोलीस ठाणे येथे भेटल्यानंतर मला सांगितले होते. दिनांक २८/११/२०२३ रोजी माझा जामीन मंजूर झाला व न्यायालयाचे आदेशाने माझी भांडूप पोलीस स्टेशन येथे प्रत्येक सोमवारी हजेरी ठेवली होती. तसेच माझी मुलगी तृप्ती हिचा दिनांक ०५/१२/२०२३ रोजी अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे.

दिनांक १८/१२/२०२३ रोजी मी माझे विरूध्द भांडूप पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयात हजेरी देण्यासाठी सकाळी ११.०० वा. गेलो असता पोलीस स्टेशनच्या आवारात पोलीस उप निरीक्षक अरविंद बिराजदार यांनी माझी भेट घेवून माझी मुलगी तृप्ती हिचे नाव चार्जशिट मधून वगळून गुन्हयाची सी समरी करण्याकरीता रूपये ३,००,०००/– इतक्या रक्कमेची मागणी केली. माझी श्री.बिराजदार, पोलीस उप निरीक्षक, भांडूप पोलीस स्टेशन, मुंबई यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २१/१२/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे तक्रारी अर्ज दिला. मी दिलेल्या लेखी तक्रारीची कारवाई करण्याकरीता

पो नि बनसोडे यांनी दोन पंचाना बोलावले, पंचाना मी दिलेली तक्रार वाचण्यास देवुन त्यावर पंचाच्या सहया घेवुन सदरचा अर्ज त्यांनी स्वत:कडे ठेवुन घेतला.

दिनांक २२/१२/२०२३ रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्याकरीता पो.नि. बनसोडे यांनी मला व पंचाना पडताळणीबाबत सुचना दिल्यानंतर त्यांनी माझ्या शर्टाच्या आतील बनियनवर व्हाईस रेकॉर्डर लावुन चालु करून मी व पंच श्री. रविंद्र माने, असे पोलीस उप निरीक्षक अरविंद बिराजदार यांची भेट घेण्याकरीता भांडूप पोलीस ठाणे येथे पाठविले होते. त्यावेळी पोलीस ठाणे येथील कर्मचाऱ्यांनी सांगितलेवरुन व मोबाईलवरुन पोउनि बिराजदार यांना फोन केला असता त्यांनी ते रात्रपाळी कर्तव्य करून घरी गेले असल्याचे सांगितल्याने सकाळी त्यांची भेट होवू शकली नाही. त्यामुळे आम्ही पुन्हा पो.नि. बनसोडे यांचेजवळ आलो असता पो.नि. बनसोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर बंद केला व काय झाले असें विचारले असता भेट न झाल्याबाबत सागितले. त्यानंतर पो.नि. बनसोडे यांनी मला पोलीस उप निरीक्षक अरविंद बिराजदार यांना मोबाईल वर संपर्क करून स्पिकर फोन ऑन करून बोलण्यास सांगीतले. त्यावेळी माझ्या बनियनला लावण्यात आलेला व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा सुरु करण्यात आला. त्यानंतर पो.नि. बनसोडे यांनी दिलेल्या सुचनेवरून माझ्याकडील माझे पत्नी नामे सौ. मनिषा हिचे मो.क्र. ८९२८६५५४१३ वरून पोलीस उप निरीक्षक अरविंद बिराजदार यांना त्यांचा मोबाईल क्रमांक ९७६४३१२१३० वर संपर्क साधण्याकरीता मी कॉल केला असता पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांनी ते रात्रपाळी करून घरी गेले असल्याने त्यांनी संध्याकाळी सात ते आठ वाजता भेटण्यासाठी बोलावले व फोन बंद केला. सदर संभाषणानंतर पोलीस निरीक्षक बनसोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांनी सायंकाळी भेटण्याकरीता बोलावल्याने त्यावेळची पडताळणी स्थगित करुन त्याचदिवशी संध्याकाळी पुन्हा पडताळणी करण्यात येणार असल्याचे पो.नि. बनसोडे यांनी आम्हाला सांगितले.

आम्ही पुन्हा त्याच दिवशी रात्रौ ०८.३० वा. पोलीस पथक, दोन पंच असे मनपा शाळा भांडूप स्टेशन रोड, भांडूप ( पश्चिम ) येथे पोचलो त्यावेळी मला माझा मुलगा प्रफुल्ल याचा ९१३७८०९६४० या मोबाईल नंबरवरुन माझ्याकडील माझे पत्नी नामे सौ. मनिषा हिचे मो.क्र. ८९२८६५५४१३ वर फोन आला व त्याने मला पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांना फोन करण्यास सांगितले म्हणून मी पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांना माझ्याकडील माझे पत्नी नामे सौ. मनिषा हिचे मो.क्र. ८९२८६५५४१३ वरुन त्यांचा मोबाईल क्रमांक ९७६४३१२१३० वर फोन केला असता त्यांनी मला ऐरोली वेस्ट येथील गरम मसाला हॉटेलमध्ये भेटण्यासाठी बोलावले त्यामुळे पोनि बनसोडे यांनी संशय येवू नये म्हणून माझी चारचाकी वाहन क्र. एम एच ०३ झेड ७१११ हे वाहन सोबत घेतले त्यामधून मी, माझे मेव्हणे नामदेव दगडू जावीर, पोनि बनसोडे, पोहवा गायकवाड व पंच माने असे ऐरोली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारकजवळ गेलो तेथे पोनि बनसोडे यांनी पंच माने यांना चालत जावून गरम मसाला हॉटेलजव थांबणे बाबत व मी ज्याठिकाणी बसतो त्यालगत ऐकू येईल असे बसणे बाबत सूचना दिल्या. त्यानंतर पो.नि. बनसोडे यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला व्हॉईस रेकॉर्ड लावून तो चालू करून पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांना भेटण्यासाठी पाठविले.

मी गरम मसाला हॉटेलमध्ये पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांना भेटल्यानंतर पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांनी खूप कमी केलंय....... मला काहीच नको तुमच्या कडून.....डिसेंबरच्या आत देवून टाका.... मंगळवार बुधवार आहेना देवून टाका मंगळवापर्यंत सव्वीस तारखेला....... फोन लावा मंगळवारी आणि सात

Scanned with OKEN Scanner

लाखच देणार काय..... असे म्हणाले असता मी त्यांना दोन लाखाचं तुमचं आरेंजमेंट करू असे म्हणालो असता..... बिराजदार हे मला..... **म्हणजे अजून झालचं नाही काय तुमचं**..... तुम्ही काय म्हणाले होते **शुक्रवारी करून देतो**..... तुम्ही मला अजून पेडींग ठेवलेत...... आता काय क्लिअर करणार मी बोलो तेच करा......त्यानंतर मी दोन लाखामध्ये आपल अॅडजेस्टच करा असे म्हणालो असता बिराजदार हे अॅडजस्टच केले आहे तुम्हाला असे म्हणून .......याच्यामध्ये मला काहीच भेटले नाही मी क्लिअर सांगतो असे म्हणाले आहेत...... **त्यानंतर मी तीनच्या ऐवजी दोन लाखामध्ये कंन्फर्म करा असे म्हणालो असता बिराजदार हे मला... ..परत तेच बोलताय विषय .... आता मी काय बोलणार नाही... आता काय बोलूच नका.......** परत एकटेच या..... तदनंतर मी लोकसेवक यांना दिनांक २६/१२/२०२३ रोजी भांडूप पोलीस स्टेशन येथे ३,००,००,०/– सदर लाचेची रक्कम घेवुन येतो असे सांगितले असे आमच्यात संभाषण झाले आहे. त्यानंतर मी पुन्हा पो.नि. बनसोडे यांचेकडे आलो. त्यावेळी पो.नि. बनसोडे यांनी माझे बनियनला लावलेले व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यांच्या ताब्यात घेतला व त्यांनी मला विचारणा केली असता मी पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांचेसोबत भेटिदरम्यान घडलेला प्रकार सांगितला. त्यावेळी पो.नि. बनसोडे यांनी त्यादिवशी पडताळणी स्थगित केली.

दिनांक २६/१२/२०२३ रोजी मी ला.प्र.वि. कार्यालयात आलो असता पो.नि. बनसोडे यांनी यापुर्वी पैशांची व्यवस्था करणेबाबत मला सांगितले होते, परंतु त्यावेळी माझेकडे बचतीमधून रु.१,००,०००/– रक्कम घेवून आलो. त्यावेळी पो.नि. बनसोडे यांनी उर्वरीत रक्कम या खेळण्यातील नोटा वापरण्याचे पंचासमक्ष ठरवले. त्याचवेळी पोलीस उप निरीक्षक बिराजदार हे माझा मुलगा प्रफुल्ल याच्या संपर्कात राहत असल्याने प्रफुल्ल यास पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांचे पत्नीची तब्येत बरी नसल्याने ते सुट्टीवर असल्याचे कळविल्याने प्रफुल्ल याने मला फोनद्वारे सदर माहिती दिली. त्याबाबत मी पो.नि.बनसोडे यांना सांगितले. त्यामुळे संदर दिवशी करण्यात येणारी पडताळणी व सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.

दिनांक २८/१२/२०२३ रोजी माझी मुलगी तृप्ती हिची पोलीस स्टेशन मध्ये हजेरी असल्यामुळे मला पो.नि. बनसोडे यांनी पोलीस उप निरीक्षक बिराजदार हे पोलीस स्टेशनला आहेत काय हे पाहण्यासाठी सांगितले होते त्यामुळे हजेरीला माझी पत्नी मनिषा ही मुलगी तृप्ती हिचे सोबत पोलीस स्टेशनला गेली होती. त्यावेळी पत्नीने तेथे चौकशी केली असता पोलीस उप निरीक्षक बिराजदार हे रजेवर असल्याचे तिला देखील सांगितले होते. त्यानंतर माझा मुलगा प्रफुल्ल याने त्याचा मोबाईल क्र. ९१३७८०९६४० यावरून चार वेळा पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांना त्यांचा मोबाईल क्रमांक ९७६४३१२१३० वर फोन लावला परंतू त्यांनी फोन उचलला नसले बाबत पो.नि.बनसोडे यांना मी सांगितले त्यामुळे त्यांनी मला व मुलास ला.प्र.वि. कार्यालयात बोलावले म्हणून दिनांक ०९/०१/२०२४ रोजी मुलगा प्रफुल्ल यास घेवून ला.प्र.वि.कार्यालयात आलो त्यावेळी पोनि बनसोडे यांचे समक्ष मुलगा प्रफुल्ल याने त्याचा मोबाईल क्रमांक ९१३७८०९६४० वरुन पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांना त्यांचा मोबाईल क्रमांक ९७६४३१२१३० वर फोन लावला परंतू त्यावेळी देखील फोन उचलला नाही, त्यामुळे पोनि बनसोडे यांनी परत पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांचा फोन येतो का बघा असे सांगितले परंतू परत त्यांचा फोन आला नाही. तसेच मला माझे वकील अब्दुल्ला यांचेकडून समजले की माझे व मुलीचे विरूध्द चार्जशिट कोर्टात दाखल झाले आहे.

मी पडताळणी कारवाई दरम्यान पंच श्री. माने यांचे समवेत पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांना भेटलो त्यावेळी त्यांना मी त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देणार होतो त्यामुळे त्यांना मी पैसे सोबत घेवून आलो आहे असे वाटत होते त्यामुळे ते घाबरलेल्या स्थितीत होते व वारंवार आणखी कोणी सोबत आहेत काय असे विचारत होते परंतू त्यानंतर मी पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांना अजून बँकेचे काम झाले नाही मंगळवारी २६ तारखेला पैसे देतो असे सांगितले. मी पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांचकडून पैसे देण्याकरीता वेळ मागून घेतल्यामुळे त्यांना संशय आला असावा, त्यामुळे त्यांनी पुन्हा माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली नाही. तसेच त्यांनी मुलीचे नाव चार्जशिट मधून कमी करण्यासाठी व सी समरी मंजूरीकरीता लाचेच्या रक्कमेची मागणी केली होती, परंतू सध्या आमचे दोघांचे विरूध्द कोर्टात चार्जशिट दाखल केले असून त्यांचेकडे माझे काहीएक काम उरले नसल्यामुळे पोलीस उप निरीक्षक बिराजदार हे त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारतील असे मला वाटत नाही.

तरी पोलीस उप निरीक्षक अरविंद बिराजदार यांनी माझेविरुध्द तसेच माझी मुलगी तृप्ती पाटील हिचे विरूध्द भांडूप पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयाची माझ्याकरीता " सी " समरी मंजूरीकरीता व माझी मुलगी तृप्ती पाटील हिचे नाव गुन्हयातून कमी करण्यासाठी माझेकडे रु.३,००,०००/- इतक्या लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबुल केल्याचे पोलीस उप निरीक्षक बिराजदार व माझ्या संभाषणातून स्पष्ट झाले आहे. सदरबाबत पोलीस उप निरीक्षक बिराजदार यांनी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले आहे. माझी पोलीस उप निरीक्षक अरविंद बिराजदार, भांडूप पोलीस स्टेशन यांच्याविरोधात तक्रार असून कायदेशीर कारवाई होणेस, विनंती आहे.

माझा वरील जबाब मराठीमध्ये टंकलिखीत केला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला असता तो मी सांगीतल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

(सुरेश बनसोडे)
पोलिस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

६/२/२०२४

9. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे फिर्यादि यांनी दिलेल्या तक्रारीवरून केलेल्या पडताळणीवरून
Reasons for delay in reporting by the complainant/informant
चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक
Unnatural / Accidental Death Case No., If any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने नमूद वेळी व ठिकाणी केलेल्या पडताळणीवरून लोकसेवक अरविंद बिराजदार, पोलीस उपनिरीक्षक, भांडुप पोलीस ठाणे, मुंबई यांनी तक्रारदार श्री. आप्पा गोरख पाटील व त्यांची मुलगी सृजनी पाटील हिचे विरुद्ध भांडुप पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये तक्रारदार यांचेकडील "ती" [illegible] व त्यांची मुलगी सृजनी पाटील हिचे नाव गुन्ह्यातून कमी करण्यासाठी स्वतःच्या वैयक्तिक प्रभावाचा वापर करून व स्वतः करीता गैरलाभ मिळविण्याच्या उद्देशाने रु. 3,00,000/- लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याचे मान्य केले म्हणून भ्र.प्र.अ. 1988 चे कलम 7 अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
सुरज बनसोडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)............ Rank............ No............ to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to............ (3) Transferred to P. S. ............
District............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ...... सुरज बनसोडे
पदनाम Rank...... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ला. प्र. वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख............
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Scanned with OKEN Scanner